# ज्ञानेश्वरीची निंदा कशासाठी ?

**देगलूरकर शरदचंद्र एकनाथ**
(मराठी विभाग) कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शंकरनगर, ता. बिलोली जि. नांदेड

'ज्ञानेश्वरी' सारख्या संतसाहित्याविषयी अनुकूल व प्रतिकूल असे लेखन सध्या होत आहे. यातील पुष्कळ लेखन असे असते की, त्याच्या लेखकांनी साकल्याने संतांचे हृद्गत जाणण्याचा प्रयत्नच केलेला नसतो. काही ऐकीव माहिती, काही निराधार समजुती, काही काल्पनिक तर्कदुष्ट विचार अशा गोष्टींवर आधारित लिखाण करण्याची सवय अनेकांची दिसून येते. संतांविषयी लेखन करतांना सध्या असे लेखन होत आहे; ही अत्यंत दुदैवाची गोष्ट आहे.

ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत व तुकोबांची गाथा ही वारकरी संप्रदायाची प्रस्थानत्रयी मानली जाते. त्यांचा सखोल अभ्यास केल्यावाचून कोणालाही संतांविषयी योग्य पध्दतीने लिहिता येणार नाही. परंतु या पायाभूत ग्रंथाचा व्यासंग न करता त्यासंबंधी प्रतिकूल लेखन काही लोक करीत आहेत. स्वतःचा पूर्वग्रहदूषित दृष्टीकोन घेऊन संतांसंबंधी विचार केला जात आहे.

असा एखाद्याचा दृष्टिकोन चुकीचा असला की त्याला सत्यार्थाचे आकलन होत नाही. अशाच प्रकारचा चुकीचा व पूर्वग्रहदुषित दृष्टिकोन ठेऊन पुरुषोत्तम खेडेकर यांनी ज्ञानेश्वर आणि त्यांनी निर्माण केलेली ज्ञानेश्वरी यांची अत्यंत हीन दर्जाची निंदा केलेली आहे. ज्ञानेश्वरीला 'महाविषमता वादी ग्रंथराज' असे म्हणतांना त्यांना यक्तिंचितही संकोच वाटला नाही.

खेडेकरांच्या या लेखात असत्य, असंबध्द आणि विसंगत अशा अनेक गोष्टी आहेत. त्यांच्या लेखावरुन हेच लक्षात येते की त्यांनी ज्ञानेश्वरी वाचलीच नाही. काहीतरी तर्कवितर्क करुन किंवा ऐकीव माहितीच्या आधारावर त्यांनी ज्ञानेश्वरीसंबंधी वाईट धारणा करुन घेऊन त्या अत्यंत आदरणीय ग्रंथाची व ग्रंथकर्त्याची सारा महाराष्ट्र ज्यांच्याविषयी कृतज्ञता गेली सात शतके व्यक्त करत आला आहे, अशा ज्ञानेश्वरीची निंदा केलेली आहे.

साहित्य संमेलनातील ग्रंथ दिंडीच्या पालखीत ज्ञानेश्वरी ठेवू नये, हे सांगण्यासाठी खेडेकरांनी आजवरच्या साहित्यसंमेलनांचाही पूर्वग्रहदूषित दृष्टिनेचं विचार केला आहे. त्याबद्दल मला या ठिकाणी फार काही बोलावयाचे नाही. 'ज्ञानेश्वरी' पालखीत का नको, या बाबत थोडक्यात संदर्भ तपासणे आवश्यक आहे. भावनिक पातळीवर विचार न करता सत्य तपासून घेणे व वागणे आवश्यक आहे. त्यासाठी खालील मुद्दे समोर आहेत. असे म्हणून श्री. खेडेकर यांनी काही मुद्दे मांडलेले आहेत त्याबद्दलच विचार करु.

खेडेकरांचा पहिला मुद्दा असा आहे की, "ज्ञानेश्वरी हा ग्रंथ साहित्य सम्मेलनाच्या दिंडी पालखीत ठेवण्याचा निर्णय घेताना कोणते निकष लावले होते ? त्यावेळी ज्ञानदेवापेक्षा ज्येष्ठ असणाऱ्या संतांचे नामदेव महाराज, चोखा महाराज, जनाबाई, सोयराबाई, सावता महाराज, चक्रधर स्वामी इत्यादी समतावादी साहित्यग्रंथ, अभंगगाथा ठेवण्याबाबत विचार झाला होता काय ? "

या पहिल्या मुद्यावरुन खेडेकरांच्या संतविषयक तोकडया आकलनाचा परिचय होतो. ज्ञानेश्वर व ज्ञानेश्वरीस ते ज्या अर्थाने विषमतावादी मानतात त्या अर्थाने इतर संतांचे ग्रंथ विषमतावादी नाहीत काय ? नामदेव, चोखा, जनाबाई इत्यादींचे साहित्य समतावादी आहे व ज्ञानेश्वरांचेच विषमतावादी ; असा साक्षात्कार खेडेकरांना कुठे झाला ? त्यांनी नामदेवांची गाथा वाचली नाही का ? वर्णव्यवस्थेचे वर्णन करणारे ज्ञानदेव जर खेडेकरांच्या दृष्टीने विषमतावादी आहेत तर मग नामदेवांनाही त्यांना विषमतावादीच ठरवावे लागेल. नामदेवांच्या गाथेत, वर्णधर्माचे पालन हात नाही, हा कलीचा प्रभाव, असे वर्णन करतांना नामदेव म्हणतात.

**"न चले वर्णाश्रम धर्म आचरण |**
**न घडे व्रत दान तप कोणा ||**
**ब्राम्हण त्याजिती ब्रह्मकर्म |**
**ऐसे वर्तवान मांडले || (ना.गा. १८२५)**
**थोर वर्तमान पडेल काळु |**
**चहू वर्णाचा होईल मेळू ||" (ना.गा. १८२७)**

मग असे म्हणणारे नामदेव हे, ज्ञानदेवांच्या खेडेकरांच्या दृष्टीने विषमतावादी असलेल्या सामाजिक आशयाहून वेगळा आशय सुचवतात की काय ? तरीही खेडेकर म्हणतील की 'हे मला माहितच नव्हते, असे जर नामदेवांचे उद्गार असतील तर नामदेवही 'महाविषमतावादी' म्हणून नामदेवांची गाथाही नको, ' असे हे सर्वसंत विषमतावादी आहेत या निर्णयावर खेडेकर येतीलही. परंतु एक गोष्ट प्रामुख्याने लक्षात घ्यावी लागेल की तत्कालीन सामाजिक वास्तवात, व्यवस्थेत संतांनी काही मर्यादेपर्यंत वर्णव्यवस्थेची उपयुक्तता मान्य केलेली असली तरी तिच्यात भेददृष्टीमधून,

विषमतेमधून व व्यक्तीच्या मनोवृत्तीमधील हीनतेव्दारे जी विकृती निर्माण झालेली होती तिच्या विरुध्दही संतांनीच हत्यार उपसले होते. परमार्थ साधनेमधील वर्णधर्माची अप्रस्तुता सांगून सामाजिक ऐक्याचे सफल प्रयोगही संतांनी केलेले होते. ज्या ज्ञानदेवांना खेडेकर महाविषमतावादी समजतात तेच ज्ञानदेव-

**म्हणोनि कुळजाति वर्ण | हे आघवेची गा अकारण |**

असेही म्हणतात हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

यानंतर क्रमाने येणारे २,३,४ व ५ या क्रमांकाचे खेडेकरांचे मुद्दे फारसे विचार करण्यासारखे नाहित. कारण जे लेखन काही सिध्दांताला धरुन केले जाते त्यावरच विचार करणे योग्य आणि शक्य असते. जया लेखनात सगळे काही विवादस्पद असते त्यावर विचार करणेही कठीणच असते. या चारही मुद्यामध्ये खेडेकर जे काही लिहीतात ती सर्व विधाने सिध्दांतरुप आहेत व त्या सिध्दांतांच्या समर्थनासाठी त्यांनी काही प्रमाण देण्याचीही आवश्यकता मानलेली नाही. त्यामुळे या ठिकाणचे प्रत्येक वाक्य विवादास्पद व आजवरच्या वाडमयेतिहासामधील सिध्दांताला सोडून आहे, एवढेच म्हणता येईल. त्या प्रत्येक मुद्यांचा त्यांनी ससंदर्भ विचार मांडला असता तर त्यावर काही चिंतन करणे शक्य होते.

नंतर मुद्दा क्र. ६ मध्ये खेडेकर म्हणतात की, "ज्ञानेश्वरी ओवीबध्द आहे. ओवीबध्दता हा ब्राह्मणी प्रकार समजतात" खेडेकराचे हे विधानही अत्यंत अज्ञानमूलक आहे. वस्तुतः ओवी हा छंदच मुळात लोकजीवनातून बहरलेला ओवी व अभंग हे लोकजीवनाला जवळचे असलेले सुलभ असे काव्यप्रकार स्वीकारुनच संतांनी लोकजीवनाशी ऋणानुबंध राखला जनाबाईच्या जात्यावरच्या ओव्यांपासून आजच्या ग्रामीण स्त्रीपर्यंत सर्वत्र ही ओवी खेळत असताना ओवीबध्दता हा ब्राह्मणी साहित्याचा प्रकार समजतात हा खेडेकरांचा शोध अजबच म्हणावा लागेल. कदाचित खेडेकरांना हे विधान ओविबध्द अशा विस्तृत ग्रंथाच्या संदर्भात करावयाचे असेल. तरीही ज्या ग्रामगीतेचा ते आदराने उल्लेख करतात ती तुकडोजी महाराजांची वस्तुतः महान निर्मिती ओवीबध्दच आहे ना. मग ग्रामगीताई ब्राह्मणी साहित्यच की काय ?

ज्ञानेश्वरी राज्यघटनेशी विसंगत व तुकोबांची गाथा मात्र राज्यघटनेशी सुसंगत असे खेडेकरांना कशावरुन वाटते ते त्यांनी ससंदर्भ स्पष्ट केले असते तर बरे होते. भारतातील तथाकथित जुन्या सांस्कृतिक संघर्षाचे खापर खेडेकरांना ज्ञानेश्वरीवरच का फोडावे वाटते ? 'ज्या अर्थी जगातील सर्व ब्रह्मवृंद ज्ञानेश्वरीचा एकमुखी उदोउदो करतात, त्या अर्थी ज्ञानेश्वरीतील सार बहुजन समाजाच्या हिताचे नाही, ' असा सिध्दांत मांडताना खेडेकरांनी नामदेववादी ब्राह्मणेतर संतांनी केलेला ज्ञानेश्वरीचा यथार्थ गौरव दिसत नाही काय ?

**नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी |**
**एक तरी ओवी अनुभवावी ||**

हे नामदेवांचे उद्गार त्यांनी वाचलेले असतीलच ना.

आजही संतांच्या अनेक धारणांचे यथार्थ आकलन होऊ शकत नाही. संतांच्या ज्या गोष्टी आपल्याला आज समजू शकत नाही त्या चुकीच्याच होत्या असे मानण्याची घाई करणेही अयोग्य आहे. संतांच्या विचारांचा समन्वय करुन अर्थ लावला तर सर्वच संतांचे पुरोगामित्व ही स्पष्टपणे दृष्टीगोचर होते. ज्ञानेश्वरीही त्याला अपवाद नाही. ज्ञानेश्वरीची पालखी महाराष्ट्रात गावोगावी आहे. बहुजनांच्या ऱ्हदयाकाशपालखीत ज्ञानेश्वरी विराजमान आहेच. साहित्य संमेलनाच्या पालखीची ज्ञानेश्वरीला गरज नाही. तशी ती भारताच्या घटनेसही नाही. घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना ज्ञानेश्वरी खेडेकरांसारखी महाविसमतावादी वाटली असती तर त्यांनी बहिष्कृत भारताच्या शिरोभागी '**आता कोदंड घेऊन हाती**' ही ज्ञानेश्वरीतील ओवी छापलीच नसती. राज्यघटना स्तुत्य आहेच परंतु तिला स्तुत्य ठरवण्यासारखी खेडेकरांनी केलेला ज्ञानेश्वरीला निंद्य ठरवण्याचा अव्यापारेषु व्यापार मात्र अत्यंत निंद्य आहे.